नागपुर म.न.पा.
शिक्षण विभाग (माध्य.
आवक क्र 1957
दिनांक 14/8/14

G.R.( PARIPATRAK ) LEGAL

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (लेखा व वित्त विभाग)

क्रमांक : 211 / प्रलेविअ / 2014 दिनांक : 7 / 8 / 2014

## परिपत्रक

प्रति,

1) सर्व विभाग प्रमुख, महानगरपालिका, नागपूर
2) सहाय्यक आयुक्त ( सर्व झोन )
महानगरपालिका, नागपूर

विषयः– **महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना, सेवानिवृत्ती / कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांना शासन निर्णयानुसार दिनांक 1 सप्टेंबर, 2014 पासून 10% दराने महागाई भत्ता वाढ लागू करण्याबाबत.**

**संदर्भ** :– 1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक–मभवा 1114 प्र.क्र.12 / सेवा–9, दि. 7 मे, 2014
2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक–निभवा 2014 / प्र.क्र.57 / सेवा–4, दि. 8 मे, 2014

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयानुसार राज्य शासनाने सुधारीत वेतन श्रेणीत वेतन घेणाऱ्या राज्य शासकीय व इतर पात्र त्यांच्या कर्मचाऱ्यांना, सेवानिवृत्ती / कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांना दिनांक 1 जानेवारी, 2014 पासून ( दिनांक 1 मे, 2014 पासून प्रत्यक्ष वेतनात ) सुधारीत वेतन संरचनेतील मुळ वेतनावरील ( वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन ) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर 90% वरून 100% ( 10% दराने ) महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. सोबत वर नमूद शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार महानगरपालिकेतील नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना, सेवानिवृत्ती / कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांना **दिनांक 1 सप्टेंबर, 2014 पासून** 90% ऐवजी 100% ( 10% ) दराने महागाई भत्ता वाढ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

1) शासन निर्णयानुसार महानगरपालिकेतील नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना व सेवानिवृत्ती / कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांना 90% ऐवजी 100% ( 10% ) दराने महागाई भत्ता वाढ **दिनांक 1 सप्टेंबर, 2014 ( सप्टेंबर, 2014 पेड इन ऑक्टोंबर 2014 ) पासून प्रत्यक्ष वेतनात देयकात लागू करण्यात यावी.**

2) सदहू खर्च कर्मचाऱ्यांचे वेतन विभागाच्या ज्या व्यय पदामधून आहरण करण्यात येते त्या लेखा शिर्षाखली मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

सर्व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक कार्यवाहीकरीता सर्व संबंधितांच्या नजरेस आणावे.

**( मा. आयुक्त यांचे दिनांक 6 / 8 / 2014 चे आदेशान्वये )**

सहपत्र :– वरील प्रमाणे

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी
महानगरपालिका, नागपूर

देयक लिपिक
सर्व माध्य. शाळां
कार्यवाही करावी.